पुण्य नगरी पा. क्र. १

# वसई-विरार महापालिकेत 'प्रभारी पद नियुक्तीत घोटाळा?

## लाचलुचपत प्रतिबंध विभागाकडे चौकशीची मागणी

**। वसई :** वसई-विरार महानगरपालिकेतील बहुतांश प्रभागांत प्रभारी पद नियुक्तीआड मोठा घोटाळा उघड होण्याची शक्यता असून, या प्रकरणी आस्थापना विभागातील संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते चरण भट यांनी लाचलुचपत विभागाकडे केली आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिकेची निर्मिती ३ जुलै २००९ रोजी झालेली आहे. २०१४ साली मनपासाठी आकृतीबंध जाहीर करण्यात आलेला आहे. या आकृतीबंधानुसार विविध पदांवर करायच्या नियुक्त्यांचे नियमन व सेवांचे वर्गीकरण करण्यासाठी नियम करण्यात आलेले आहे. मात्र, वसई-विरार महापालिकेतील बहुतांश विभागांत या नियमांची अंमलबजावणी न करता पायमल्ली करण्यात आली आहे. पालिकेतील बहुतांश विभागांत आजही प्रभारी सहाय्यक आयुक्तांची नियुक्ती करण्यात येत असल्याने यामागे मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते चरण भट यांनी केली आहे. पालिकेच्या आकृतीबंधातील नियमानुसार, वसई-विरार महापालिकेच्या सर्व प्रभागांत सेवा ज्येष्ठता यादी अनुषंगाने अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे क्रमप्राप्त होते. तसेच प्रभारी पद हे ६ महिन्यांसाठी असते. मात्र, पालिकेतील बहुतांश प्रभागांत प्रभारी पदे कायम ठेवण्यात आलेली आहेत. ही नियुक्ती करताना संबंधित अधिकाऱ्यांची शैक्षणिक पात्रता, अनुभव व ज्येष्ठता लक्षात घेतली जात नाही. ही नियुक्ती करण्यामागे केवळ आस्थापना विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा आर्थिक हेतू असतो, असे भट यांचे म्हणणे आहे. प्रभारी अधिकाऱ्यांच्या माध्यमातून केवळ वसुली केली जाते. हेतूपूर्ती होताच या अधिकाऱ्यांची त्या पदावरून उचलबांगडी करण्यात



येते. या अधिकाऱ्यांवर कोणतीही जबाबदारी निश्चित करण्यात येत नसल्याने पालिकेत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार बोकाळल्याचे भट यांचे म्हणणे आहे. विशेष म्हणजे पालिकेच्या लेखापरीक्षकांनी अधिकारी-कर्मचारी नियुक्ती व बदलीचे लेखापरीक्षण करणे गरजेचे असताना आजपर्यंत याचे लेखापरीक्षण झालेले नाही. त्यामुळे या प्रकरणाची तातडीने चौकशी करण्यात यावी, अशी मागणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे भट यांनी केली आहे. पालिकेच्या आस्थापना विभागाने दोन दिवसांपूर्वी एका अधीक्षकाला बाजार वसुली निविदा न काढल्याचे कारण देत त्यांच्या निवृत्ती दिवशीच निलंबित केलेले आहे. या कामाकरता त्यांची नियुक्ती केलेली नसल्याने पालिकेने केलेले हे निलंबन नियमबाह्य आहे. दोन वर्षांपूर्वी बाजार वसुली व अन्य कामांकरता पालिकेने निविदा समिती गठीत केलेली होती. या सगळ्या कामांवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी या समितीची होती. त्यामुळे या समितीतील अधिकारी व ठेकेदारावर कारवाई करणे गरजेचे असताना पालिकेच्या आस्थापना विभागाने वैयक्तिक रोषातून नाहक एका अधीक्षकाला निलंबित करून वेठीस धरलेले आहे, असे भट यांचे म्हणणे आहे. मागील दोन वर्षांच्या प्रशासकीय काळातील पालिकेचे काम असमाधानकारक आहे. विविध कामे आणि पालिकेत प्रभारी सहाय्यक आयुक्त नियुक्तीतून मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे. त्यामुळे या प्रकरणातील अधिकाऱ्यांची चौकशी व्हावी, याकरता सामाजिक कार्यकर्ते चरण भट यांनी लाचलुचपत प्रतिबंध विभागाकडे तक्रार केली आहे.

### भ्रष्टाचार झाला नसल्याचा निर्वाळा

**पालिकेची सहाय्यक आयुक्त ही पदे सतत प्रशासकीय पद्धतीने दिली जातात. आपण अधीक्षक दर्जाच्या कर्मचाऱ्यांना ते पद दिलेले आहे. असा कुठलाही भ्रष्टाचार वगैरे काही नाही. ही जी पदे त्या त्या अधीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांना आपण पद अपग्रेड करून दिलेली आहेत. त्यामुळे कोणताही भ्रष्टाचार झालेला नाही, असे अतिरिक्त आयुक्त अजिंक्य बगाडे यांनी स्पष्ट केले आहे.**

सकाळ पा. नं. ५

## गुजरातमधून बेपत्ता अल्पवयीन मुली मिरा रोडला सापडल्या

भाईंदर, ता. २ (बातमीदार) : गुजरातमधून बेपत्ता झालेल्या तीन अल्पवयीन बहिणींना मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलिसांच्या गुन्हे शाखेने अवघ्या ४८ तासांत मिरा-रोड येथून शोधून काढले. मुलींना गुजरात पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

गुजरात येथील कारंज भागातून ३१ ऑक्टोबरला १२ ते १५ वयोगटातील तीन बहिणी हरवल्याची तक्रार त्यांच्या वडिलांनी पोलिस ठाण्यात नोंदवली. पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक अविराज कुराडे यांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली ही कामगिरी करण्यात आली.

सकाळ पा. नं. ४

## बसच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

भाईंदर, ता. २ (बातमीदार) : मिरा-भाईंदर महापालिकेच्या परिवहन सेवेची बस व दुचाकी यांची समोरासमोर धडक होऊन त्यात एका तरुणाचा मृत्यू झाला आहे. बुधवारी सकाळी दहाच्या सुमारास मिरा रोडच्या हटकेश येथील पंधरा नंबर बस स्टॉप परिसरात ही घटना घडली.

मिरा रोडच्या रामदेव पार्क परिसरात राहणारा चोवीस वर्षीय सुनील मैत्री या दुचाकीवरून जात असताना हा अपघात झाला. त्यात सुनील बसच्या पुढच्या चाकाखाली आल्यामुळे गंभीर जखमी झाला. त्याला रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या वेळी दुचाकीवर मागच्या सीटवर बसलेला दुसरा तरुण मात्र किरकोळ जखमी झाला आहे. मिरा रोड पोलिसांनी बसचालकावर गुन्हा दाखल केला आहे.

सकाळ पा. नं. ४

# मिरा-भाईंदरमध्ये स्वीकारणार हरकती

भाईंदर, ता. २ (बातमीदार) : काही दिवसांपूर्वीच प्रसिद्ध झालेल्या मिरा-भाईंदर शहराच्या नव्या प्रारूप विकास आराखड्यावर हरकती व सूचना दाखल करण्यासाठी आता ठाण्याला जाण्याची आवश्यकता राहणार नाही. त्यासाठी मिरा-भाईंदरमध्ये ठाणे नगररचना विभागाचा कर्मचारी उपस्थित राहणार आहे. मिरा-भाईंदर महापालिकेकडून त्यासाठीची व्यवस्था उपलब्ध करून दिली जाणार आहे. येत्या दोन दिवसांत ही सुविधा उपलब्ध होईल, अशी माहिती आयुक्त दिलीप ढोले यांनी दिली.



सध्या आराखड्यावर हरकती-सूचना नोंदवण्यासाठी ठाणे येथे जावे लागत असल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. याबाबतचे वृत्त 'सकाळ'ने प्रसिद्ध केले होते.

मिरा-भाईंदर शहराचा पहिला विकास आराखडा १९९७ मध्ये प्रसिद्ध झाला होता. त्याची मुदत २०१७ मध्येच संपुष्टात आली. त्याच्या एक वर्ष आधी नवीन विकास आराखडा तयार करण्याचे काम महापालिकेने हाती घेतले होते, पण तो प्रसिद्ध व्हायच्या आधीच फुटल्याचे आरोप झाले. त्यामुळे राज्य सरकारने नव्याने आराखडा तयार करण्याचे आदेश दिले, पण आराखडा तयार करण्याचे मिरा-भाईंदर महापालिकेचे अधिकार काढून ते ठाण्यातील नगररचना विभागाला दिले. मात्र या विभागाने देखील कासवाच्या गतीने काम सुरू ठेवल्यामुळे आराखडा तयार होण्यास २०२२ उजाडले. कही दिवसांपूर्वीच शहराचा प्रारूप आराखडा प्रसिद्ध करण्यात आला असून त्यावर तीस दिवसांत हरकती सूचना नोंदवायच्या आहेत. या आराखड्यातही अनेक त्रुटी असल्याचे आरोप होत आहेत. अनेकांना त्यावर हरकती नोंदवायच्या आहेत. पण हरकती नोंदवण्यासाठी ठाणे येथील नगररचना विभागाच्या कार्यालयात जावे लागत असल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

### » दोन दिवसांत सुविधा सुरू

नागरिकांना होणारा मनस्ताप लक्षात घेऊन महापालिका आयुक्त दिलीप ढोले यांनी हरकती व सूचना मिरा-भाईंदरमध्येच स्वीकारण्याची व्यवस्था करावी, अशा सूचना ठाणे नगररचना विभागाला केल्या आहेत. यासाठी लागणारी जागा, आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यास महापालिका तयार आहे, असेही महापालिकेकडून कळविण्यात आले आहे. त्यामुळे येत्या दोन दिवसांत आराखड्यावरील हरकती व सूचना मिरा भाईंदरमध्येच स्वीकारण्याची व्यवस्था उपलब्ध होईल, तसेच प्रारूप विकस आराखड्याच्या प्रतीदेखील याठिकाणी नागरिकांना उपलब्ध होतील, अशी माहिती आयुक्त दिलीप ढोले यांनी दिली.

सकाळ पा.नं. ३

# नायगाव खाडीपुलाला टपऱ्यांचा अडथळा

## सात वर्षांपासून पुलाचे काम रखडल्याने नागरिकांचे हाल

विरार, ता. २ (बातमीदार) : नायगाव रेल्वेस्थानकाला जाण्यासाठी असलेल्या खाडीवरील पुलाचे काम गेल्या सात वर्षांपासून रखडले आहे. पण आता पुलाच्या कामात ट्रॅंकला बाजूला असणाऱ्या टपऱ्यांचा अडथळा निर्माण झाला आहे. पण या पुलाअभावी नागरिकांचे हाल होत आहेत.

नायगाव रेल्वेस्थानकावरून पूर्वेला असलेल्या १५ गावांना जाण्यासाठी असलेल्या रस्त्यामध्ये एक खाडी असून या खाडीवर पूल उभारण्याचे काम २०१४ पासून सुरू आहे. नायगाव खाडी पुलावर पादचारी पूल तयार करण्याचे काम सुरू असून हे काम विविध प्रकारच्या अडचणींमुळे पूर्ण होऊ शकले नाही. मध्यंतरी पुलाच्या एका बाजूचा भाग खाडीतील दलदलीमुळे खचून गेला होता. त्यानंतर या पुलाचे पुन्हा सर्वेक्षण करण्यात आले होते. याशिवाय दलदल असल्याने त्याचे माती परीक्षण ही करण्यात आले होते. त्यानुसार पुढील पुलाच्या बांधकामासाठी नवीन आराखडा तयार करून पूल ४६ मीटरने वाढविला आहे. यासाठी ६.३० कोटींचा निधीही मंजूर झाला आहे. मात्र नायगाव स्थानकांच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावर पुलाचे काम अपूर्ण आहे. नायगाव स्टेशनला जाण्याच्या मार्गात टपऱ्या उभारण्यात आल्या आहेत. त्या टपऱ्या अजूनही हटविण्यात आल्या नसल्याने अडचणी निर्माण होत असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने स्पष्ट केले आहे.



विरार : नायगाव खाडीपुलाच्या कामात टपऱ्यांचा अडथळा निर्माण झाला आहे.

> नायगाव खाडी पुलाच्या एका बाजूचे काम बाकी आहे. त्यामध्ये येत असलेले अडथळे आम्ही दूर करण्याचा प्रयत्न करीत आहोत. ते दूर होताच पुढील कामही जलदगतीने पूर्ण करण्यात येईल.
>
> - **प्रशांत ठाकरे**, उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग वसई

सकाळ पा.नं. ३

# 'वसई-विरारमध्ये शहरात नो पार्किंग झोन तयार करा'

विरार, ता.२ (बातमीदार) : पार्किंगची सोय नसल्याने नागरिकांना वाहतूक पोलिसांच्या कारवाईला सामोरे जावे लागत आहे. तर शहरातील मुख्य रस्त्यांवर अनधिकृत गॅरेज आणि दुकानदारांनी अतिक्रमण केले आहे. त्यामुळे यासाठी रास्ता अडविणाऱ्यांवर आधी कारवाई करा, तसेच नो पार्किंग झोन जाहीर करा, त्यानंतरच कारवाई करण्याची मागणी भाजपकडून करण्यात येत आहे.

वसई-विरारमधील नागरिकांना वाहतुकीच्या समस्येला मोठ्या प्रमाणात तोंड द्यावे लागत आहे. शहरात पालिकेची अपुरी बस सेवा असल्याने त्यांना खासगी वाहनांचा वापर करावा लागत आहे. त्यातच शहरात पार्किंगची अपुरी सुविधा असल्याने रस्त्याच्या कडेला वाहने उभी असलेली दिसून येतात. यावर पालिकेसह वाहतूक पोलिसही कारवाई करतात. दुसरीकडे मुख्य रस्त्यांवर गॅरेजचे आणि फेरीवाल्यांचे अतिक्रमण झाले आहे. तसेच अवैध रिक्षा थांबे या कारणांमुळे नागरिकांना वाहतुकीच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे आधी वाहतुकीस अडथळा आणणाऱ्या मोठ्या वाहनांवर कारवाई करावी, नो पार्किंग झोन बनवावे, त्यानंतर दुचाकी वाहनांवर कारवाई करावी, अन्यथा या विरोधात भाजपतर्फे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा वसई विरार भाजप जिल्हा उपाध्यक्ष मनोज बारोट यांनी दिला.

लोकमत पा. नं. १

# प्रारूप आराखड्यात हरितपट्ट्यावर संक्रांत

धीरज परब

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर महापालिकेच्या प्रारूप सुधारित विकास आराखड्यात शहरातील हरितपट्ट्यावर मोठ्या प्रमाणात संक्रांत आली आहे. त्यामुळे ग्लोबल वॉर्मिंगचा तसेच निसर्गाला धोका निर्माण झाल्याची चिंता जागरुक नागरिकांतून व्यक्त केली आहे.

मीरा-भाईंदर शहराचा प्रारूप सुधारित विकास आराखडा २८ ऑक्टोबरला जाहीर केला आहे. त्यावर हरकती व सूचना नोंदवण्यासाठी ३० दिवसांची मुदत देण्यात आली. या विकास आराखड्यात पूर्वी ठेवलेला हरितपट्टा अर्थात ना विकास क्षेत्राला कात्री लावली आहे. वास्तविक शहराचे नियोजन करताना त्या शहराची भौगोलिक परिस्थिती व निसर्गाचा काळजीपूर्वक विचार केला पाहिजे; मात्र या आराखड्यात त्याचा अभाव आहे.

खाडी व समुद्रकिनाऱ्याच्या परिसराला असलेला ग्लोबल वॉर्मिंगचा मोठा धोका विचारात घेणे आवश्यक आहे. त्याचा विचार तर केला गेला नाहीच; पण कांदळवन व बफर झोन, सीआरझेड, भरतीरेषा, पाणथळ आदी महत्त्वाच्या बाबीही काटेकोरपणे विचारात घेतल्या गेलेल्या नाहीत. जागेवर कांदळवन क्षेत्र असूनही ते दर्शवले गेले नाही. तर ज्या ठिकाणी कांदळवन नष्ट केले गेले आहे व भराव-बांधकामेप्रकरणी गुन्हे दाखल आहेत. न्यायालयात दावे सुरू आहेत तरीदेखील काही राजकारणी व बडे बिल्डर यांच्या जमिनी न्यायालयाच्या आदेशांचे उल्लंघन करून विकासासाठी खुल्या केल्या आहेत. त्यामुळे विकास साधताना पर्यावरणाचा समतोल बिघडणार आहे.

## ना-विकास क्षेत्र केले कमी

संजय गांधी राष्ट्रीय वन हद्दीलगत असलेल्या काजूपाडा, चेणे, वरसावे, घोडबंदर, काशी व महाजनवाडी क्षेत्रातला इकोसेन्सेटिव्ह झोनसह ना-विकास क्षेत्र मोठ्या प्रमाणात कमी केले आहे. एकूणच प्रारूप विकास आराखड्यात काही राजकारणी व बडे विकासक-ठेकेदार आदींच्या जमिनी त्यांना मोठा आर्थिक फायदा करून देण्यासाठी निवासी क्षेत्र टाकून विकासासाठी खुल्या केल्या जात असल्याचा आरोप होत आहे.

सकाळ पा. नं. ४

# पर्ससीनविरोधात संघर्ष पेटणार

## एलईडी दिव्यांचाही सुळसुळाट; पारंपरिक मच्छीमार हवालदिल

भाईंदर, ता. २ (बातमीदार) : उत्तन ते पालघरपर्यंतच्या सागरी पट्ट्यात पर्ससीन जाळ्या व एलईडी दिवे असलेल्या मासेमारी नौकांचा सुळसुळाट झाला आहे. या पट्ट्यात पर्ससीन मासेमारी करण्यास बंदी असूनही झुंडशाहीच्या जोरावर या नौका बेकायदेशीरपणे मासेमारी करत आहेत. परिणामी पारंपरिक मच्छीमार हवालदिल झाला असून शासकीय यंत्रणांनी या मासेमारी नौकांवर कारवाई करावी, अशी अपेक्षा करत आहे. शासकीय यंत्रणांनी कारवाई केली नाही तर स्थानिक मच्छीमार एकत्र येऊन पर्ससीन मासेमारी नौकांचा प्रतिबंध करतील, अशा मनस्थितीत मच्छीमार असल्यामुळे समुद्रात संघर्ष उभा राहण्याची भीती व्यक्त होत आहे.

पर्ससीन मासेमारीचा पारंपरिक मासेमारी व पर्यावरणावर होणारा परिणाम याचा अभ्यास करण्यासाठी राज्य सरकारने समिती गठित केली होती. या समितीने केलेल्या शिफारशीनुसार पालघर जिल्ह्यातील झाई ते रायगड जिल्ह्यातील मुरूडपर्यंतच्या किनाऱ्यापासून बारा सागरी मैलापर्यंतचे क्षेत्र पारंपरिक मासेमारीसाठी राखीव ठेवण्यात आले आहे. या क्षेत्रात पर्ससीन जाळ्यांद्वारे मासेमारी करण्यास बंदी घालण्यात आहे. २०१६ मध्ये राज्य शासनाने तसेच आदेश जारी केले आहेत. असे असतानाही गेल्या काही दिवसांपासून उत्तनसह वसई, पालघर, डहाणूपर्यंतच्या सागरी क्षेत्रात पर्ससीन जाळ्या व एलईडी दिवे असलेल्या मासेमारी नौका बेधडकपणे मासेमारी करत आहेत. त्यामुळे आता पर्ससीन विरुद्ध पारंपरिक मच्छीमारांमध्ये संघर्ष उभा राहण्याची चिन्हे आहेत.

### पिल्लेही जाळ्यात

पर्ससीन नौकांवर महाकाय जाळ्या बसवलेल्या असतात. या जाळ्या यांत्रिक पद्धतीने समुद्राचा तळ अक्षरशः खरवडून काढतात. त्यामुळे त्यात मोठ्या मासळीसह मासळीची पिल्ले देखील पकडली जातात. त्यामुळे पारंपरिक पद्धतीने मासेमारी करणाऱ्यांच्या हाती काहीच लागत नाही, असे येथील मच्छीमारांचे म्हणणे आहे.

### मासेमारांसमोर नवे संकट

काही दिवसांपूर्वी पर्ससीन मासेमारी करणाऱ्या नौकेला तब्बल दोन कोटी रुपये किमतीचे घोळ मासे मिळाले असल्याचेही मच्छीमारांनी सांगितले. आधीच समुद्रात आलेली वादळे, मासळीचा दुष्काळ याचा सामना करत असलेल्या पारंपरिक मच्छीमारापुढे आता पर्ससीन मासेमारी नौकांचे संकट उभे ठाकले आहे. बंदी असतानाही मासेमारी करणाऱ्या पर्ससीन नौकांवर शासनाकडून कोणतीही कारवाई होत नसल्यामुळे मच्छीमारांमध्ये तीव्र नाराजी आहे.



पर्ससीन नौकांविरोधात मत्स्यव्यवसाय विभागाकडे वारंवार तक्रारी केल्या आहेत. पण कारवाई करण्यासाठी यंत्रणाच नसल्याचे या विभागाकडून सांगण्यात येते. पर्ससीन नौका झुंडीने येत असून त्यांची समुद्रात मोठी दादागिरी सुरू आहे. त्यामुळे स्थानिक मच्छीमार या पर्ससीन नौकांना त्याच्याच भाषेत प्रत्युत्तर देण्याच्या मनस्थितीत आहेत. त्यामुळे सर्व शासकीय यंत्रणांनी या नौकांवर कडक कारवाई करावी, अन्यथा समुद्रात मोठा संघर्ष होईल.
- **बर्नड डिमेलो**, कार्याध्यक्ष, अखिल महाराष्ट्र मच्छीमार कृती समिती

सकाळ पा. न. २

### उपोषणकर्त्या दोन कामगारांची प्रकृती खालावली

वसई (बातमीदार) : तालुक्यातील मेट गावाच्या हद्दीत असलेल्या पेलटेक हेल्थकेअर या कंपनीतील कामगारांनी भारतीय कामगार सेनेचे सदस्यत्व स्वीकारल्याच्या रागातून येथील १५ कामगारांना कंपनीने गेल्या चार महिन्यांपूर्वी कामावरून कमी केले आहे. वारंवार विनंती करूनही कंपनी प्रशासन कामगारांना कामावर घेण्यास टाळाटाळ करत आहे. यामुळे संतापलेल्या कामगारांनी भारतीय कामगार सेनेच्या झेंड्याखाली सोमवार (ता. ३१) पासून कंपनीच्यासमोर बेमुदत उपोषण सुरू केले आहे. याची दखल प्रशासनाने न घेतल्याने तिसऱ्या दिवशीही उपोषण सुरूच आहे. दरम्यान, उपोषणास बसलेल्या दोन कामगारांची प्रकृती खालावली आहे. यासंदर्भात बोईसरचे कामगार आयुक्त किशोर दहिफळकर यांच्याशी संपर्क साधला असता कंपनीबरोबर बोलणे सुरू असल्याचे त्यांनी सांगितले; तर कंपनीचे व्यवस्थापक प्रदीप नाईक यांच्याशी संपर्क साधला असता या विषयावर निर्णय घेणारा सक्षम अधिकारी नसल्यामुळे निर्णय घेता येत नाही. गुरुवारी कंपनीचे मुख्य व्यवस्थापक येणार असून तेच निर्णय घेतील, असे सांगितले.

सामना पा. नं. ५

### ॲट्रोसिटीचा गुन्हा

भाईंदर : पालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागातील स्वच्छता कर्मचारी कांतीलाल बांगर यांना जातीवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी मनसेचे महापालिका कर्मचारी-कामगार सेनेचे अध्यक्ष हरेश सुतार यांच्यावर ॲट्रोसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भाईंदर पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल असून सुतार यांच्या अडचणीत वाढ झाली आहे.

सकाळ पा. नं. ३

## पालिकेतील भ्रष्टाचार चौकशीची मागणी

विरार (बातमीदार) : वसई-विरार महापालिकेतील बहुतांश प्रभागांत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असल्याने या प्रकरणाची तातडीने चौकशी करून "आस्थापना विभागातील संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत," अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते चरण भट यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे केली आहे. महापालिकेची सेवाज्येष्ठता यादी तयार होऊनही गेल्या पाच महिन्यांपासून त्यावर अंमलबजावणी करण्यात आली नसल्याने त्याचा फटका कर्मचाऱ्यांना बसत आहे. वसई-विरार महापालिकेसाठी २०१४ साली आकृतीबंध जाहीर करण्यात आलेला आहे. या आकृतीबंधानुसार विविध पदांवर करायच्या नियुक्त्यांचे नियमन व सेवांचे वर्गीकरण करण्यासाठी नियम करण्यात आले आहेत; मात्र महापालिकेतील बहुतांश विभागांत या नियमांची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. पालिकेतील बहुतांश विभागांत आजही प्रभारी सहाय्यक आयुक्तांची नियुक्ती करण्यात येत असल्याने यात भ्रष्टाचार होत असल्याची तक्रार चरण भट यांनी केली आहे.

सामना पा. नं. २

# घरात घुसून मारेन...

## रवी राणांची बच्चू कडूंना धमकी



मुंबई, दि. २ (प्रतिनिधी) - राज्यातील शिंदे-फडणवीस (ईडी) सरकारचे समर्थक आमदार रवी राणा आणि बच्चू कडू यांच्यातील वाद मिटलेला नाही. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या मध्यस्थीनंतरही दोघांमध्ये हमरीतुमरी सुरूच आहे. आज तर रवी राणा यांनी 'घरात घुसून मारेन' अशी धमकीच बच्चू कडू यांना दिली. त्यावर कडू यांनीही 'कुठल्या चौकात येऊ ते सांगा, मी तयार आहे' अशी प्रतिक्रिया दिल्याने हा वाद अधिक पेटण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

'पहिल्यांदा चूक केली म्हणून माफ करतोय' अशा शब्दांत बच्चू कडू यांनी रवी राणा यांच्यावर मंगळवारी टीका केली होती. त्या टीकेला राणा यांनी आज प्रत्युत्तर दिले. "रवी राणाने उद्धव ठाकरे यांचा दम खाल्ला नाही, बच्चू कडू तर काहीच नाहीत. प्रेमाच्या भाषेवर एकदा नव्हे तर दहा वेळा माघार घेण्यास रवी राणा तयार आहे. पण कोणी दम देत असेल तर त्याला घरात घुसून मारण्याची धमकही माझ्यात आहे," असे रवी राणा म्हणाले.

राणा यांचे हे आव्हान स्वीकारताना बच्चू कडू यांनीही यावर "राणांनी तलवार घेऊन यावे, मी फुले घेऊन तयार राहतो. मंगळवारी मी माझ्या प्रहार संघटनेची भूमिका मांडली होती. कोणी निवडून यायचे हे जनता ठरवेल असे मी म्हटले होते. कुणाचेही नाव घेऊन बोललो नव्हतो. त्यामुळे राणांच्या बोलण्याची मी दखल घेत नाही," अशी प्रतिक्रिया दिली. लवकरच आपण मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांची यासंदर्भात भेट घेणार असल्याचेही कडू यांनी सांगितले.

### सत्ताधारी खोक्यांसाठी भांडताहेत - पटोले

'सत्ताधारी आमदार ५० खोक्यांसाठी भांडतात, कडू आणि राणांमध्ये सत्तेतील हिश्श्यावरून वाद आहेत,' अशी प्रतिक्रिया काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी या वादावर दिली. या वादाशी काँग्रेसला काही घेणे-देणे नसून त्यापेक्षा महत्त्वाचे प्रश्न राज्यात आहेत, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले.

सामना पा. नं. ५

पालकांचा आरोप; नालासोपाऱ्यातील हृदयद्रावक घटना

# डॉक्टरांच्या चुकीमुळे नवजात बाळाचा कापावा लागला हात

वसई, दि. २ (सा.वा.) – नालासोपारा येथील एका नवजात बालकावर उपचार करताना त्याचा हात गमावल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. डॉक्टरांच्या बेफिकिरीमुळे ही घटना घडली असून संबंधित डॉक्टरांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी बाळाच्या पालकांनी केली आहे. या दुर्दैवी घटनेप्रकरणी पालकांनी पोलीस, पालिका आणि जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडे तक्रारी केल्या आहेत.

नालासोपारा येथे राहणाऱ्या अंजली वाला हिने शहरातील त्रिवेणी या खासगी रुग्णालयात ५ ऑक्टोबरला जुळ्या मुलांना जन्म दिला होता. यातील एका बाळाची शुगर कमी असल्याचे सांगून डॉक्टरांनी सलाईन लावले. मात्र त्या सलाईनमुळे त्याचा उजवा हात काळा पडत गेला. मालीश केल्यावर ठीक होईल असे त्यांनी सांगितले, पण बाळाच्या तब्येतीत काहीच सुधारणा होत नसल्याने पालकांनी त्याला मुंबईच्या वाडिया रुग्णालयात नेले. यावेळी बाळाच्या हाताला गँगरिन झाल्याने बाळाचा हात कापण्यात आला. माझ्या बाळाची प्रकृती चांगली होती. डॉक्टरांनी बाळाला चुकीच्या पद्धतीने सलाईन लावले आणि त्यामुळे बाळाचा हात कापावा लागला, असा आरोप बाळाची आई अंजली वाला यांनी केला.

### नियमानुसार कारवाई करणार

यासंदर्भात लवकरात लवकर चौकशी करून अहवाल सादर केला जाईल, अशी माहिती जिल्हा शल्यचिकित्सक अधिकारी डॉ. संजय बोदाडे यांनी दिली. या प्रकरणात जिल्हा वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या अहवाल आल्यानंतर नियमानुसार कारवाई केली जाईल, अशी माहिती नालासोपारा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विलास सुपे यांनी दिली. चुकीच्या उपचारांचा आरोप रुग्णालयाने फेटाळला आहे. बाळावर तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार सुरू होते, पण पालकांनी त्याला इतर रुग्णालयात नेले. त्यामुळे तेथे काय झाले सांगता येणार नसल्याचे रुग्णालयाचे वरिष्ठ डॉ. अतुल पारसकर यांनी सांगितले.

सामना पा. नं. ५

तिसऱ्यासोबत घरोबा केल्याची विकृती

# पहिल्या पतीसह प्रियकराने महिलेवर फेकले ॲसिड



वसई, दि. २ (सा. वा.) – तिसऱ्यासोबत घरोबा केल्याने चिडलेल्या प्रियकर आणि पतीने महिलेवर ॲसिड फेकल्याचा खळबळजनक प्रकार नालासोपाऱ्यात घडला. या घटनेत तिचा प्रियकरही जखमी झाला. त्यांच्यावर नालासोपारा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पेल्हार पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हे दाखल केले असून पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत.

नालासोपारा पूर्व वाकण पाडा येथे राहणारी करिष्मा अली (२०) या विवाहित तरुणीने घाटकोपर येथील तौफिक इद्रीसीबरोबर प्रेमविवाह केला होता. मात्र लग्नानंतर काही दिवसातच त्यांच्यात बिनसल्यानंतर तिने तौफिकला सोडचिठ्ठी दिली. तिने कामरान अन्सारी या घाटकोपरमधील दुसऱ्या तरुणासोबत लिव्ह ॲण्ड रिलेशनशिपमध्ये राहण्याचा निर्णय घेतला. काही दिवसानंतर कामरान अन्सारीने तिच्यासोबत लग्नाला नकार दिल्याने तिने त्यालाही सोडचिठ्ठी दिली आणि नालासोपारातील कमाल खानसोबत तिसऱ्यांदा घरोबा केला. ही गोष्ट पहिला पती तौफिक इद्रीसी व दुसरा प्रियकर कामरान अन्सारी यांना कळताच त्यांनी करिश्मा अलीला 'मेरी नही तो किसी और की नही होने दुंगा, तुम्हे बरबाद कर दुंगा' असे म्हणत धमकी दिली होती. अखेर दोघांनी संगनमताने रात्री नालासोपारा येथे राहत असलेल्या तिच्या घराच्या खिडकीची स्लायडिंग उघडत गाढ झोपलेल्या करिश्मा व कमालवर ॲसिड फेकले. त्यानंतर दोघांनीही धूम ठोकली. या घटनेनंतर पोलीस दोन्ही आरोपींच्या मागावर आहेत.

लोकसत्ता पा.न.१

# वसईत वाया जाणाऱ्या पाण्याचा पुनर्वापर

## सूर्या पाणी प्रकल्पाच्या जलशुद्धीकरणातील वाया जाणाऱ्या पाण्यावर पुनर्प्रक्रिया; दररोज आठ दशलक्ष लिटर पाण्याची बचत

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** सूर्या पाणी प्रकल्पाच्या जलशुद्धीकरणातून वाया जाणाऱ्या पाण्यावर पुनर्प्रक्रिया करून ते पाणी पुन्हा वापरात आणण्याचा निर्णय पालिकेने घेतला आहे. यासाठी दुक्टण येथे ८ कोटी रुपयांचा जलशुद्धीकरण प्रकल्प उभारण्यात येणार आहे. यामुळे दररोज ८ दशलक्ष लिटर पाण्याची बचत होणार आहे.

वसई, विरार शहराला सूर्या पाणी प्रकल्पाच्या दोन्ही टप्प्यातून दररोज २०० दशलक्ष लिटर, उसगाव आणि पेल्हारमधून ३० दलशक्ष लिटर असा मिळून दररोज २३० दशलक्ष लिटर एवढा पाणीपुरवठा होत असतो. सूर्या प्रकल्पाचे पाणी पालघर येथील दुक्टण येथील जलशुद्धीकरण प्रकल्पात आणले जाते. तेथे पाण्याचे शुद्धीकरण केल्यानंतर ते पाणी शहरात वितरित केले जाते. परंतु जलशुद्धीकरण प्रकल्पात पाण्यावर प्रक्रिया होत असताना ८ दशलक्ष लिटर पाणी वाया जात असते. हे पाणी समुद्रात सोडण्यात येते. मुळात शहरातील पाण्याची मागणी जास्त असताना ८ दशलक्ष लिटर पाणी नाईलाजाने वाया जात आहे. त्यामुळे हे जलशुद्धीकरण प्रकल्पातून वाया जाणाऱ्या पाण्यावर पुनर्प्रक्रिया करून ते पाणी पुन्हा वापरात आणण्याचा निर्णय पालिकेने घेतला आहे. यासाठी दुक्टण येथेच एक पुनर्प्रक्रिया प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रकल्पासाठी लागणारा ८ कोटी रुपयांचानिधी मिळावा यासाठी पालिकेने राज्य शासनाला प्रस्ताव सादर केला आहे.

याबाबत माहिती देताना पालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने सांगितले की, कुठल्याही जलशुद्धीकरण प्रकल्पात पाण्यावर प्रक्रिया करत असताना पाणी वाया जात असते. सूर्या प्रकल्पातून दररोज २०० दशलक्ष लिटर पाणी येत असल्याने पाणी वाया जाण्याचे प्रमाण ८ दशलक्ष लिटर आहे. या पाण्यावर पुर्नप्रक्रिया केल्यास ते पुन्हा वापरता आणणे शक्य आहे. त्यासाठी हा प्रकल्प उभारत आहोत. हा प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर शहराला ८ दशलक्ष लिटर अतिरिक्त पाणी मिळू शकणार ' '



### पाणीगळतीचे प्रमाण १५ टक्के

वसई, विरार शहराला दिवसाला २३० दशलक्ष लिटर पाण्याचा होतो. त्यात पाणी गळतीचे प्रमाण १५ टक्के आहे. म्हणजे दिवसाला ३४.५ दशलक्ष लिटर पाणी वाया जात असते. गळतीचे हे प्रमाण इतर महानगर पालिकेच्या तुलनेने सर्वाधिक आहे. अशा पद्धतीने दर महिन्याला ३४. ५ दशलक्ष लिटर प्रमाणे पालिकेला दिवसाला ३ लाख ३१ हजार ४४१ रुपये वाया जात असतात. या वाया जाणाऱ्या पाण्यामुळे महिन्याला ९९ लाख ४३ हजार २३० रुपये आणि वर्षाला ११ कोटी ९३ लाख रुपये पाणी गळतीमुळे वाया जात आहेत. दुसरीकडे प्रति माणशी १३५ दशलक्ष लिटर पाण्याची गरज असताना पालिकेकडून केवळ ११० लिटर पाणी सरासरी दिले जात आहे. शहरातील २४ लाख लोकसंख्येला ३५० दशलक्ष लिटर पाण्याची गरज आहे. मात्र कमी पाणी आणि पाण्याची गळती मिळून दररोज शहराला १२० दशलक्ष लिटर पाणी कमी मिळत आहे.

लोकसत्ता पा. नं. १

# बापाणे-कामण रस्त्याच्या कामाला हिरवा कंदील

लोकसत्ता वार्ताहर


**वसई:** गेली काही वर्षे रखडलेल्या बापाणे-कामण रस्ते कामाला हिरवा कंदील मिळाला आहे. या रस्त्याच्या कामाचे पालिकेने कार्यादेश दिले आहेत.

वसई पूर्वेतील भागातून राष्ट्रीय महामार्ग आणि राज्य मार्ग यांना जोडणारा कामण ते बापाणे असा रस्ता तयार करण्यात येणार होता. या रस्त्याच्या कामासाठी वीस वर्षांपूर्वी जागेचे भूसंपादन होऊन यासाठी निधी उपलब्ध झाला होता. परंतु सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सुस्त कारभारामुळे कामाला सुरवात होऊ शकली नव्हती. त्यानंतर हा रस्ता वसई विरार पालिकेच्या आराखड्यात घेण्यात आला आहे. परंतु विविध प्रकारच्या निर्माण झालेल्या अडचणींमुळे रस्त्याचे काम रखडले होते. आता पालिकेने या रस्त्याच्या कामाला हिरवा कंदील दाखविला आहे.

बापाणे ते कामण हा १५ मीटर रुंद १ हजार ९१८ मीटर लांबीचा डांबरी रस्ता तयार केला जाणार आहे. याशिवाय या रस्ते कामाच्या मध्ये चिंचोटी नदी वाहते. त्यामुळे नदीवर ६० मीटर लांबीचा आरसीसी पूल ही तयार केला जाणार आहे.

रस्ता आणि पूल या दोन्हीसाठी सुमारे १७ कोटी १२ लाख रुपये इतका निधी खर्च केला जाणार आहे. या कामासाठी मेसर्स एस. एन. डेव्हलपर्स ठेकेदारास कार्यादेश देण्यात आल्याचे पालिकेने सांगितले आहे.

६ नोव्हेंबर रोजी या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन नालासोपारा विधानसभेचे आमदार क्षितिज ठाकूर यांच्या हस्ते होणार आहे. लवकरच या कामाची सुरुवात केली जाणार असल्याने नागरिकांना या रस्त्याचा मोठा फायदा होऊन इंधन आणि वेळेची बचतही होणार आहे.



## वळसा चुकणार

नायगाव पूर्व बापाणे येथून कामण परिसर वा कामणवरून नायगाव पुर्वेकडे ये-जा करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग आणि चिंचोटी-भिवंडी मार्गावरून ८ ते १० किलोमीटरचा वळसा घालावा लागतो. याशिवाय चिंचोटी-भिवंडी मार्ग नेहमीच खराब आणि खड्डेमय असल्याने वाहतूक कोंडीच्या समस्येमुळे वाहनचालकांना त्रास सहन करावा लागतो. तसेच मोठ्या प्रमाणावर इंधन आणि वेळेचा अपव्यय होतो. या रस्त्यामुळे वळसा घालून जाण्याचे अंतर कमी होऊन वळसा घालून कराव्या लागणाऱ्या प्रवासातून सुटका होणार आहे.

"कामण बापाणे रस्ता तयार व्हावा यासाठी सातत्याने पालिकेशी पाठपुरावा सुरू होता. आता हा रस्ता तयार झाल्यास ग्रामीण भागातील नागरिकांना ही शहरी भागाशी जोडण्यास मदत होईल तर याशिवाय नागरिकांचा प्रवास सुखकर होईल.

**-कन्हैया भोईर,** माजी सभापती प्रभाग समिती 'जी'

लोकमत पा. न. ४

# पोलीस अधिकाऱ्याचा चौकीतच मृत्यू

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : विरार पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस उपनिरीक्षक संजय माळी (४८) यांचा बुधवारी संध्याकाळी सव्वासहा वाजण्याच्या सुमारास चंदनसार चौकीत हृदयविकाराचा झटका आल्याने मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.



मागील तीन दिवसांपासून ते आजारी होते. बुधवारी ते चंदनसार पोलीस चौकीत कर्तव्यावर हजर होते. संध्याकाळी चौकीत असताना त्यांना झटका आल्याने पोलीस सहकाऱ्यांनी त्यांना हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी नेले, पण तेथील डॉक्टरांनी त्यांचा मृत्यू झाल्याचे घोषित केले आहे.

या घटनेमुळे पोलिसांच्या कामावर येत असलेल्या ताणाबाबत पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. याआधीही पोलीस कर्मचारी, अधिकारी यांच्या मृत्यूच्या घटना घडल्या आहेत. पोलिसांवरील ताण कमी करण्यासाठी प्रयत्न केले जात असले तरी अशा घटना घडत आहेत. पोलिसांच्या तंदुरुस्तीबाबतही बोलले जाते. नियमित व्यायाम केला तर अशा घटना घडणे कमी होईल असे डॉक्टरांचे म्हणणे आहे.

लोकमत पा. न. ५

# अमृता फडणवीस यांनी 'वाय प्लस' सुरक्षा नाकारली

लोकमत न्यूज नेटवर्क

मुंबई : राज्य सरकारने देऊ केलेली वाय प्लस सुरक्षा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी नाकारली आहे. त्यासंबंधीचे ट्वीट त्यांनी बुधवारी केले.

अमृता फडणवीस यांनी 'लोकमत'ला सांगितले की, माझी मुंबई पोलिसांना नम्र विनंती आहे की, ट्राफिक क्लिअरन्स व्हेईकल मला पुरविण्यात येऊ नये. कोणताही लवाजमा घेऊन मला फिरायचे नाही. मला एक सामान्य मुंबईकर म्हणूनच फिरणे आवडेल. जादाची पोलीस सुरक्षा यंत्रणा कशाला? माझ्या जिवाला धोका आहे असे मला वाटत नाही. लोकांचे प्रेम आणि देवाची कृपा असेल तर मला सुरक्षेची काळजी नाही.

> अमृता यांनी सुरक्षा वाढविण्याची मागणी केली नव्हती. धोक्याची भीती लक्षात घेऊन उच्चाधिकार समितीने सुरक्षा वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. ठाकरे कुटुंबीय आणि इतरांना यापूर्वी अशा सुविधा दिल्या होत्या.
>
> \- देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री

मुंबईतील वाहतुकीची परिस्थिती चिंताजनक आहे. त्यावरील उपाययोजना गेली अडीच वर्षे रखडलेल्या होत्या. आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मुंबईतील पायाभूत सुविधांचा गतीने विकास करून दिलासा देतील, असा विश्वास आहे.

पुढारी पा. न. १

# अधिकारी निलंबित

विरार : पालिकेची बाजार कर वसुली करणारे दोन अधिकाऱ्यांना वसुली ठेक्यातील घोटाळाप्रकरणी निलंबित करण्यात आले आहे. या प्रकरणी संबंधित उपायुक्तांनी चौकशी करून कारवाई केली. प्रभाग समिती सी मधील अधिक्षक राजन गावडे व मेहेर यांना निलंबित केले आहे. वसुलीच्या ठेक्यात ठेका घेतलेल्या ठेकेदारांनी पालिकेला कोट्यवधी रुपयांचा परतावा केला नव्हता. कारण पालिकेने ठेका देताना निविदा काढली नव्हती. याबाबत जागरुक नागरिकांनी माहिती अधिकारातून माहिती घेतल्यावर या प्रकरणाची चौकशी झाली. अधिकाऱ्यांवर जरी कारवाई झाली तरी संबंधित ठेके चालविणाऱ्यांवर कारवाई झालेली नाही. यापैकी राजन गावडे हे ३१ ऑक्टोबर रोजी पालिका सेवेतून निवृत्त झाले. त्यांच्यावर त्याच दिवशी कारवाई करण्यात आली.

महाराष्ट्र टाइम्स पा.नं. १

# 'त्या' बिल्डरांची अटक अटळ?

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

मीरा रोडमधील निवासी प्रकल्पातील दोन सदनिका आधीच अन्य ग्राहकांना विकलेल्या असताना त्याबाबत एका ग्राहकाकडून लाखो रुपये घेऊन त्याची फसवणूक करणाऱ्या दोघा लबाड बिल्डरांना अटकेपासून अंतरिम संरक्षण देण्यास सुटीकालीन मुंबई उच्च न्यायालयाने नुकताच नकार दिला. तसेच तक्रारदार ग्राहकाला अटकपूर्व जामीन अर्जात प्रतिवादी करण्याचे निर्देश देऊन न्या. माधव जामदार यांनी याप्रश्नी १० नोव्हेंबरला पुढील सुनावणी ठेवली.

बांधकाम व्यावसायिक इंतेखाब हसन सय्यद व त्याच्या भागीदाराने त्यांच्या प्रकल्पातील ४०१ व ४०२ क्रमांकाच्या दोन सदनिका एका ग्राहकाला विकून त्याबद्दल त्याच्याकडून लाखो रुपये घेतले. मात्र, त्याच सदनिका अन्य ग्राहकांना आधीच विकल्या असल्याचे आणि त्यांचा ताबाही त्यांच्याकडे असल्याचे लक्षात आल्याने त्या ग्राहकाने २०१८मध्ये मीरा रोड पोलिसांत एफआयआर नोंदवला. त्यामुळे अटकेच्या भीतीने सय्यद व त्याच्या भागीदाराने ठाणे अतिरिक्त सत्र न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज केला होता. त्यावेळी हा वाद न्यायालयाबाहेर तडजोडीने मिटवणार असून सदनिका रिक्त करून घेऊन तक्रारदार ग्राहकाला देणार असल्याची हमी देऊन एक महिन्याचा कालावधी देण्याची विनंती बिल्डरांनी केली. त्यामुळे सत्र न्यायालयाने दोघांना २९ जून २०१८ रोजी अटकपूर्व जामीन मंजूर केला. मात्र, त्यानंतरही बिल्डरांनी आपली हमी पाळली नाही. त्यामुळे तक्रारदाराने सत्र न्यायालयात अर्ज केला. त्याचा विचार करून सत्र न्यायालयाने २९ जानेवारी २०२१ रोजी या बिल्डरांचा अटकपूर्व जामीन रद्द केला. त्यांनी तक्रारदाराबरोबरच न्यायालयाचीही दिशाभूल केल्याचे सत्र न्यायालयाने आपल्या आदेशात नोंदवले. मात्र, त्यानंतरही पोलिसांना या बिल्डरांचा थांगपत्ता लागला नाही. त्यामुळे पोलिसांनी केलेल्या अर्जाची दखल घेऊन ठाणे सहदिवाणी न्यायालयाने १५ ऑक्टोबर २०२२ रोजी त्यांच्याविरोधात अजामीनपात्र अटक वॉरंट बजावले. त्यामुळे या बिल्डरांनी ॲड. घनश्याम उपाध्याय यांच्यामार्फत उच्च न्यायालयात धाव घेतली.

'आरोपींनी प्रकरण एक महिन्यात तडजोडीने मिटवण्याची हमी देऊनही चार वर्षांहून अधिक काळ त्याचे पालनच केले नाही. न्यायालयाची दिशाभूल करून अटकपूर्व जामीन मिळवला. त्यामुळे जामीन रद्द करण्याचा सत्र न्यायालयाचा आदेश प्रथमदर्शनी योग्य असून अर्जदार अंतरिम संरक्षणासाठी पात्र नाहीत', असे न्या. जामदार यांनी सुनावणीअंती स्पष्ट केले.

## उच्च न्यायालयाने अंतरिम संरक्षणाची विनंती फेटाळली

